॥ श्री ॥ **निवासी फ्लॅट बिनकब्जाचे साठेखत**

**मौजे पिंपळगाव बसवंत.**ता.निफाड.जि.नाशिक येथील फ्लॅटचे कायम फरोक्त खरेदीखताकामी बिनकब्जाचे साठेखत किंमत **रक्कम रुपये १९,८५,०००/-अक्षरी रुपये एकोणाविस लाख पंचाऐंशी हजार मात्र** आजचे बाजारभावाने व आमची आपापसात मुळ ठरलेली किंमत **रक्कम रुपये १४,५०,०००/-अक्षरी रुपये चौदा लाख पन्नास हजार मात्र**चे किंमतीप्रमाणे आज तारीख २४ माहे सप्टेंबर सन २०२६ रोज गुरूवार ते दिवशी...

**कु.राजु भिकन पिंजारी.वय:-२२ वर्ष**
Pan No.FVAPP2067J.UID No.311705921693
**हसीना भिकन पिंजारी.वय:-४० वर्ष**
Pan No.DFBPP1012J.UID No.616498022898
धंदा:-व्यापार.रा.दगुनाना मोरे नगर,पिंपळगाव बसवंत.
ता.निफाड.जि.नाशिक.४२२२०९

**लिहुन घेणार**

**--यांसी--**

**१)श्री.सुदर्शन प्रेमगिर गोसावी.वय:-४२ वर्षे.**
Pan No.AOJPG7962C.UID No.790588098418
**२)सौ.स्वाती सुदर्शन गोसावी.वय:-३५ वर्षे.**
Pan No.BDEPG5536P.UID No.578398416642
अ.नं.१ धंदा:-व्यापार.अ.नं.२ धंदा:- गृहिणी.दोघे रा.माळी गल्ली,पिंपळगाव बसवंत.
ता.निफाड.जि.नाशिक.४२२२०९

**लिहुन देणार**

कारणे खालील फ्लॅटचे कायम फरोक्त खरेदीखताकामी बिनकब्जाचे साठेखत लिहून व नोंदवून देतो की,

१) **मिळकतीचे वर्णन :-**

जिल्हा परिषद **नाशिक**,पंचायत समिती **निफाड**,पैकी स्वतंत्र नगरपरिषद **मौजे पिंपळगाव बसवंत.**हद्दीतील **दगुनाना मोरे नगर,** येथील **''साई सागर हाईट्स''** मधील निवासी फ्लॅटची मिळकत...

तुकडी जिल्हा **नाशिक**,पोट तुकडी तालुका **निफाड**,पैकी **मौजे पिंपळगाव बसवंत.** शिवारातील **दगुनाना मोरे नगर ,** येथील **''साई सागर हाईट्स''** मधील निवासी फ्लॅटची मिळकत.

**सर्वे नं.३५/३६/१अ/१ब मधील प्लॉट नं.३८ यासी २७६-१४ चौ.मी.यासी आकार २७ रूपये ६१ पैसे.येणेप्रमाणे वरील क्षेत्रात निवासी कारणाकरीता बांधलेली आर.सी.सी. इमारत साई सागर हाईट्स मधील तिस-या मजल्यावरील फ्लॅट नं.१२ यासी न.मि.नं. ७१५५/१२ यासी क्षेत्र ६८-४९ चौ.मी.म्हणजेच ७३७.२३ चौ.फुट.**सदरचा फ्लॅट १ हॉल,२ बेडरूम + १ किचन + संडास + बाथरूम असा आहे.**सदरचे बांधकाम सुमारे ११ वर्षे जुने आहे.**

Scanned with OKEN Scanner

सदरचे फ्लॅटस्‌ला जाणेयेणेसाठी पश्चिम बाजुने रस्ता असुन त्याचे वागवहिवाटी हक्कासह तसेच हवा,उजेड घेणेचा हक्क,जिना,लिफ्ट व पॅसेज पार्किंग सामाईक वापराचे हक्कासह मिळकत दिली.

यासी चतु:सिमा :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पुर्वेस | :- | प्लॉट नं.३१ | पश्चिमेस | :- | ९ मीटर रोड |
| उत्तरेस | :- | प्लॉट नं.३५,३६,३७ | दक्षिणेस | :- | प्लॉट नं.३९ |

**(सदरचे दस्तात संक्षिप्ततेसाठी खरेदी घेणार यांचा उल्लेख ''तुम्ही'' व खरेदी देणार यांचा उल्लेख ''आम्ही''असा केलेला आहे व कलम १ मधील मिळकतीचा उल्लेख ''सदरची मिळकत'' असा केलेला आहे.)**

२) सदरील इमारतीसाठी **पश्चिम** बाजुने मुख्य रस्ता असुन इमारतीचे **मध्यभागातुन** जिना ठेवलेला असुन सदरच्या जिन्याचा वापर हा सामायिकपणे करावयाचा आहे.सदरील मिळकती मध्ये सामायिक बोअरवेल असून,त्या बोअरवेलवर इले.मोटार बसवून पाणी ओव्हर हेड टॅन्कला पुरविलेले आहे, व त्यासाठी लागणारा लाईट,पाणी व इतर सर्व अनुषंगीक खर्च हा तुंम्ही व इतर भाग धारकांनी सामायिकांत करावयाचा आहे.तसेच सदरचे इमारतीचे तळमजल्यावर इमारतीचे सर्व धारकांसाठी सामाईक पार्किंगची सोय केलेली असुन पार्किंग उपभोग सर्वांनी सामाईकात घेण्याचे हक्कासह...

३) वर कलम १ (ब) यात वर्णन केलेली मिळकत आमचेकडे मे.दु.निं.साो.निफाड यांचेकडील दस्त नंबर २६२/२०१४ अन्वये दिनांक.२२ ऑक्टोंबर २०१४ रोजी **श्री.गोरख विश्वनाथ सोनार. व इतर रा.पिंपळगाव बसवंत.ता.निफाड.जि.नाशिक.**यांचेकडुन खरेदीने घेतलेली आहे

४) तसेच सदरचे मिळकतीचा ले-आऊट प्लॅन मे.सहाय्यक संचालक नगर रचना नाशिक यांचे कडील पत्र क्र.बि.शे./मौजे पिंपळगाव बसवंत.ता.निफाड,जि.नाशिक स.नं.३५/३६/१अ/१ब ससंना/१४०/२०११.दिनांक.१२/०१/२०११ अन्वये मंजुर झालेला आहे.तसेच मिळकत हि मा. उपविभागीय अधिकारी साो.यांचेकडील जमाबंदी/कक्ष-३/बि.शे.प.क्र./७८/२०११ अन्वये दिनांक. ०२/०५/२०११ रोजी बिनशेतीकडे वर्ग करण्यात आली आहे.

५) सदरचे बिनशेती प्लॉटचे मिळकतीत मे.सरपंच साहेब.ग्रामपंचायत पिंपळगाव बसवंत.ता. निफाड.यांचे कडून बांधकाम परवानगी त्याचे कडिल ठराव नं.९६/१३६ अन्वये दिनांक. २४/०१/२०१३ अन्वये बांधकाम परवानगी घेवुन बांधकाम पुर्ण केलले आहे.

६) खालील दिलेल्या परिशिष्ट १ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर आम्ही फ्लॅट स्किम बांधकाम पुर्ण केलेले असुन त्यासाठी पिंपळगाव बसवंत ग्रामपालीका यांचेकडील ठराव नं.९५/१६० अन्वये दिनांक.२५/०१/२०१४ रोजी बांधकाम पुर्णत्वाची नोंद करण्यात आलेली आहे.

७) या दस्ताचे दस्ताचे कलम १ (ब) यात वर्णन केलेली मिळकत लिहुन घेणार यांना **भरण्याच्या तपशिलात उल्लेख** रक्कमेऐवजी कायमची फरोक्त खरेदी दयावयाची ठरलेली असून, ती किंमत आजचे बाजारभावाने योग्य व बरोबर आहे. त्याबददल तक्रार नाही.(सदर किंमतीचा भरणा या साठेखताचे अखेरचे कलमात लिहील्याप्रमाणे लिहून देणार यांना दिला आहे.)

Scanned with OKEN Scanner

८)  कलम १ (ब) यात वर्णन केलेल्या जागेवर पिंपळगांव ग्रामपंचायत यांचेकडुन जे काही टॅक्सेस आकारले जातील ते लिहून घेणार यांनी भरुन देण्याचे आहेत.त्या बांधीव जागेवर कोणत्याही सरकारी अथवा निमसरकारी खात्याकडुन जे कर आकारले जातील ते लिहुन घेणार यांनी इतर भागधारकांसह भरावयाचे आहेत.त्याची जबाबदारी अन्य कुठल्याही बांधीव जागेवर अथवा लिहुन देणार यांचेवर नाही

९)  लिहुन घेणार यांना कलम १ (ब) यात वर्णन केलेल्या बांधीव जागेचा कब्जा लिहुन देणार यांना खरेदीखत लिहुन व नोंदवून देतेवेळी दयावयाचा ठरलेला आहे. सदरची जागा उत्तम स्थितीत आहे. सर्व सुखसोई योग्य अशा मिळालेल्या आहेत हे लिहून घेणार कबुल करीत असून, जागेचे बांधकामाविषयी त्याचे प्रतिविषयी लिहुन घेणार यांची कुठलीही तक्रार नाही.

**<u>लिहुन घेणार व लिहून देणार यांचेमध्ये खालीलप्रमाणे अटी व शर्ती ठरल्या आहेत.</u>**

**अ)**  सदरचे मिळकतीची खरेदीची मुदत हि सदर मिळकतीवर असलेला स्टेट बॅंक ऑफ हैद्राबाद यांचा बोजा कमी झाल्यानंतर करण्याचे ठरलेले आहे.हया मुदतीत तुम्ही मला राहिलेली रक्कम देवून खरेदीखत लिहुन व नोंदवुन घ्यावे.

**ब)**  मिळकतीचे साठेखताकामी व खरेदीकामी येणारा खर्च स्टॅम्पडयुटी, नोंदणी फी, लिहीणावळ इ.अनुषंगिक खर्च हा लिहुन घेणार यांनी करावयाचा व सोसावयाचा आहे.

**क)**  सदरचे मिळकतीवर कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिन, लिज, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, साठेखत, इ. व अशा प्रकारचे बाबींत गुंतविलेली नाही.  तशा बाबीं निघाल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदर खर्चाने दूर करुन देऊ. तुम्हांस तोषिस लागु देणार नाही.

**ड)**  सदरचे मिळकतीचा कब्जा हा आज रोजी साठेखतावर दिलेला नसुन, तो खरेदीखत लिहुन व नोंदवुन देतेवेळी दयावयाचा ठरला आहे.

**ई)**  तसेच इमारतीचा भविष्यातील दुरुस्ती,रंग रंगोटी खर्च अगर त्या अनुषंगाने येणारा संपुर्ण खर्च हा लिहुन घेणार यांनी व इतर सहकब्जेदार यांनी सामाईकात करावयाचा व सोसावयाचा आहे. ही हया दस्ताची मुख्य अट असुन ती सर्वांवर बंधनकारक आहे व राहिल.

**उ)**  तसेच इमारतीला **''<u>साई सागर हाईट्स</u>''** असे नांव दिलेले असुन सदरचे नांवात लिहुन घेणार यांना व इतर भाग धारकांना भविष्यात नावात बदल करता येणार नाही.ही अट सर्वांवर बंधनकारक आहे व राहिल.

Scanned with OKEN Scanner

१०) <u>भरण्याचा तपशील :-</u>

रक्कम रु......................./-   अक्षरी रु.............................................
.............................................

रक्कम रु......................./-   अक्षरी रु.............................................
........   ..................................

<u>एकुण रु.१४,५०,०००/-</u>   <u>अक्षरी रुपये चौदा लाख पन्नास हजार मात्र.......</u>

वरीलप्रमाणे भरणा पावला,भरण्याची तक्रार राहिली नाही. सबब निराळे वेगळी भरणा पावतीची आवश्यकता नाही.

११) सदरचा बिनकब्जाचा साठेखत करारनामा आमचेवर व आमचे वालीवारस,हितसंबंधी, नातेवाईक यांचे बंधनकारक आहे व राहील.त्यांनी सदरचे मिळकती बाबत कोणत्याही प्रकारची हील्ला हरकत घेतल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदर खर्चाने दूर करुन देऊ.तुंम्हास तोषीस लागू देणार नाही.

हा फरोक्त खरेदीखताकामी बिनकब्जाचे साठेखत करारनामा आम्ही समजून उमजून वाचुन स्वसंतोषाने राजीखुशीने लिहुन दिला व तो आम्हाला मान्य व कबुल असल्याबद्दल त्यावर खालील साक्षीदारासमक्ष आम्ही आमच्या सहया/अंगठे करुन मे.दुयम निबंधक साहेब निफाड यांचेसमोर नोंदवुन दिलेले आहे.

<u>हे बिनकब्जाचे साठेखत करारनामा.....</u>

.........................................
**१)श्री.सुदर्शन प्रेमगिर गोसावी.**

.........................................
**२)सौ.स्वाती सुदर्शन गोसावी.**
**(लिहुन देणार)**

Scanned with OKEN Scanner

.............................................
१)कु.राजु भिकन पिंजारी.

.............................................
२)हसीना भिकन पिंजारी.
(लिहुन घेणार)

<u>साक्षीदार</u> -

१).....................................          २).....................................

Scanned with OKEN Scanner